इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

०३
कार्यक्रम पत्रिका क्र. (४/२०२६)

स्थायी समिती सभा

प्रति. दिनांक- २२/०४/२०२६

मा. ----------------------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य / सदस्या,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिका मा. स्थायी समिती सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिका स्थायी समितीची सभा शुक्रवार दि. २४/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील स्थायी समिती सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

( सतिश वसंतराव मुळीक )
सभापती,
स्थायी समिती

*****************************************************************************

**परिशिष्ठ**

०५ विषय क्र. १ : मागील सभा दि. २०/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

०६ विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इ.१ ली व २ री च्या विद्यार्थी विद्यार्थीनीना बेंच पुरवणे बाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

०७ विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता शालेय साहित्य खरेदी करणे बाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

०८ विषय क्र. ४ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सायकल वाटप' योजना राबविण्याबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०४ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस

०९ विषय क्र.५: इचलकरंजी महानगरपालिकेच्या ३३ प्राथमिक शाळांसाठी स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०६ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

१० विषय क्र.६: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक नमुद १ ते १३ शाळांमध्ये स्लॅब गळती रोखण्यासाठी नवीन पत्रे बसवून छत दुरुस्ती करण्यास मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०७ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

११ विषय क्र. ७: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळा इयत्ता १ ली ते ८ वी मधील ६८०० विद्यार्थी विद्यार्थिनींना स्पोर्ट्स ट्रॅकसूट पुरविण्यास मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०८ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

Scanned with OKEN Scanner

१२ विषय क्र.८: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमधील स्वच्छतागृह दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृह बांधकामासाठी मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०९ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

१३ विषय क्र.९: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळेंसाठी संरक्षण भिंत बांधणेस मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १० दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

१४ विषय क्र.१०: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील CCTV कॅमेऱ्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती संगणक विभागाकडुन करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ११ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

१५ विषय क्र.११: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमध्ये वाढीव वर्ग खोल्यांच्या बांधकामास मुजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

१६ विषय क्र.१२: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेंतील शिक्षक व विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ओळखपत्र ( ID Card ) सुविधा पुरविणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

१७ विषय क्र.१३: इचलकरंजी शहरातील आण्णा रामगोंडा भाजी मार्केट, शिवाजीराव खवरे भाजी मार्केट, अहिल्यादेवी होळकर भाजी मार्केट (उत्तम प्रकाश चित्रमंदिर जवळील विकली मार्केट), शॉपिंग सेंटर जवळ व शहापुर भाजी मार्केट येथे महिलांसाठी अद्ययावत मुतारी करणेबाबत तसेच शहरातील ठिकठिकाणी असणारे सार्वजनिक शौचालय व मुतारी खराब अथवा जीर्ण अवस्थेत असलेने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सदरची सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या अद्ययावत करणेबाबत श्री. अनिल देवकरण डाळया, उपमहापौर यांनी पत्राद्वारे मागणी केलेबाबत.

१८ विषय क्र.१४: धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या दि. १४/५/२०२६ रोजी होणाऱ्या जयंती निमित्त श्री. शंभुतिर्थ येथे दि. १३/०५/२०२६ , १४/०५/२०२६ रोजी शाहिरी पोवाडे, शस्त्र प्रदर्शन, मर्दानी खेळ, विद्युत रोषणाई, आतिषबाजी असे विविध कार्यक्रम आयोजित करणेकरीता योग्य अशी आर्थिक तरतुद करणेबाबत धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज प्रतिष्ठान यांनी दि. २२/०४/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेबाबत.

विषय क्र.१५: मा.सभापती यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र. ०५
दि. २४/०४/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. २०/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

मागील दि. २०/०४/२०२६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते.

अनुमोदक : नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.०६
दि. २४/०४/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इ.१ ली व २ री च्या विद्यार्थी विद्यार्थीनीना बेंच पुरवणे बाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागाकडे २५ मराठी माध्यमाच्या व ८ उर्दू माध्यमाच्या अशा एकूण ३३ प्राथमिक शाळा असून इ.१ ली ते ८ वी मध्ये एकूण ६८५१ विद्यार्थी विद्यार्थिनी आहेत .

शिक्षण विभागाकडील इ.३ री ,५ वी वी च्या विद्यार्थी –विद्यार्थिनी करिता यापूर्वी बेंच वितरीत करणेत आलेले आहेत जून २०२६ पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असून इ.१ ली,२ री च्या विद्यार्थी विद्यार्थिनीना किमान ९०६ बेंच ची आवश्यकता असुन इ.१ ली, २ री च्या विद्यार्थी विद्यार्थिनीना लागणारे ९०६ बेंच G.M. पोर्टल वरून खरेदी करणे योग्य राहील .

याकामी येणारा खर्च सन २०२६-२७ या अर्थ संकल्प वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात यावा तसेच उपलब्ध निधीसाठी आवश्यकता असल्यास विभागांतर्गत बजेट वर्गीकरण करण्यास व पुढील कार्यवाही भांडार विभागाकडून राबविण्यास मे.स्थायी समितीकडे शिक्षण समितीने ठराव क्र. ०२ दि. १५/०४/२०२६ नुसार शिफारस केली असुन शिक्षण समितीची शिफारस वाचण्यात आली.

तरी शिक्षण समितीच्या शिफारशीनुसार इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इ.१ ली व २ री च्या विद्यार्थी विद्यार्थीनीना लागणारे ९०६ बेंच पुरवणे बाबत भांडार विभागाकडुन कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत असुन भांडार विभागाने बेंच खरेदीकामी अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकरणाकडे अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर करावे व अंदाजपत्रक मंजुरीनंतर जी. एम. पोर्टल वरुन बेंच खरेदीची कार्यवाही करावी.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : र. सा. रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.०७
दि. २४/०४/२०२६

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता शालेय साहित्य खरेदी करणे बाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या प्राथमिक शाळांकडून शैक्षणिक वर्ष २०२६ २७ करीता-प्रस्तावात नमुद प्रमाणे आवश्यक शालेय साहित्य खरेदी करणेबाबत व सदर शालेय साहित्य खरेदीसाठी अंदाजे खर्च ₹७०,००,०००/- (अक्षरी रुपये सत्तर लाख फक्त) इतका अपेक्षित असुन सदर खर्च शिक्षण विभागाच्या सन २०२६-२७ मधील उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविणे शक्य आहे. सदरकामी भांडार विभागास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०३ दि. १५/०४/२०२६ नुसार मे. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता शालेय साहित्य खरेदी करणेकामी भांडार विभागाने अंदाजपत्रक तयार करुन सदर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेवून शालेय साहित्य खरेदी करणेबाबतची कार्यवाही करावी तसेच सदर शालेय साहित्य खरेदीपैकी स्कुल बॅग शासनामार्फत देणेत येणार असलेने वरील प्रमाणे नमुद शैक्षणीक साहित्यातुन स्कुल बॅग वगळणेत यावी.

सूचक : उ. सा. रजपुते

अनुमोदक : नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.०८
दि. २४/०४/२०२६

विषय क्र. ४ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सायकल वाटप' योजना राबविण्याबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०४ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या विविध प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता ५ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अंदाजे १००० (एक हजार) इतकी आहे. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे, लांब अंतरावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास सुलभ करणे आणि 'शाळा गळती' (Dropout) रोखणे या उदात्त हेतूने विद्यार्थ्यांना सायकल वाटप करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०४ दि. १५/०४/२०२६ नुसार मा. स्थायी समिती कडे शिफारस करणेत आली आहे.

याकामी इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यास दिलेली सायकल सदर विद्यार्थी इयत्ता सातवी पर्यंत शाळेत शिक्षण घेणे अनिवार्य असलेबाबत व विद्यार्थी शाळा सोडून गेला तर सायकल परत घेण्याची जबाबदारी ही संबधित मुख्याध्यापक यांची राहील अशी तरतुद करणेत आली आहे. याप्रमाणे सदर योजना राबविणे शक्य नसलेने व सायकल योजनेसाठी खर्च करणेत येणाऱ्या निधीचा अपव्यय होऊ नये तसेच सदरचा निधी अन्य शैक्षणीक उपक्रमासाठी खर्च करणे योग्य होणार असलेने सदरचा प्रस्ताव नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : प्र. ना. धुत्ते.

अनुमोदक : वै. श. मोहिते.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.०९
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.५: इचलकरंजी महानगरपालिकेच्या ३३ प्राथमिक शाळांसाठी स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०६ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

महानगरपालिका क्षेत्रातील ३३ प्राथमिक शाळां व राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि स्वच्छता राखण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करणेसाठी शाळांमधील वर्ग खोल्या व्हरांडा, शालेय परिसर, नियमित स्वच्छतेसाठी प्रत्येक शाळेला सकाळी १० ते ०५ या वेळेकरिता एक स्वच्छता कर्मचारी आणि प्रसाधनगृहांच्या नियमित स्वच्छतेसाठी चार शाळे करिता १ एक स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देणेकामी शिक्षण विभागाच्या सन २०२६ -२७ च्या वार्षिक अर्थसंकल्पातील संबधित लेखाशिर्षातील उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतुदीतून करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०६ दि. १५/०४/२०२६ नुसार मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी महानगरपालिकेच्या ३३ प्राथमिक शाळा व राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल येथे वर्ग खोल्या, शालेय परिसर स्वच्छता, गवत काढणे, छत, व्हरांडा नियमित स्वच्छतेसाठी तसेच प्रसाधन गृहांच्या नियमित स्वच्छता या सर्व कार्यवाहीसाठी आवश्यक यंत्रणा (केअर टेकर) नेमणुकीसाठी अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेऊन पुढील कार्यवाही प्रस्तावीत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच सदर कामी प्राथमिक शाळासाठी वेगळी निविदा प्रक्रिया व रा. छ. शाहु हायस्कुलसाठी वेगळी निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

सूचक : [signature] नि. कि. पोवार.

अनुमोदक : [signature] र. सा. रजपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.१०
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.६: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक नमुद १ ते १३ शाळांमध्ये स्लॅब गळती रोखण्यासाठी नवीन पत्रे बसवून छत दुरुस्ती करण्यास मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०७ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत असलेल्या शाळा मुख्याध्यापकांनी शाळांमधील स्लॅब गळती च्या दुरुस्तीची मागणी केली आहे. शाळा इमारतीच्या स्लॅबमुळे शालेय अभिलेख, शैक्षणिक साहित्य व फर्निचरचे नुकसान होत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शाळांच्या छतावर पावसाचे पाणी साचून राहिल्याने गळतीची समस्या कायम आहे. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून स्लॅबवर गॅल्वनाइज्ड (GI) पत्र्यांचे आच्छादन बसविणे तांत्रिकदृष्ट्या अधिक श्रेयस्कर ठरेल. यामुळे पावसाचे पाणी थेट स्लॅबवर न पडता बाहेर वाहून जाईल व इमारतीचे आयुष्यमान वाढण्यास मदत होईल.

सदर दुरुस्ती कामासाठी लागणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करण्यात येईल.

मनपा शाळा मुख्याध्यापकाकडून प्राप्त प्रस्ताव नुसार खालील शाळेमधील छत दुरुस्ती कामाचे स्वरूप खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे-

1. प. बाळकृष्ण वि. म. क्र. ७ छत गळती काढणे.
2. आनंदीबाई कर्वे वि. म. क्र. १०: छत गळती काढणे.
3. इ. अब्दुल हमीद वि. म. क्र. १४: वर्ग खोल्या व वरांडा गळती दुरुस्ती.
4. सरदार वल्लभभाई पटेल वि. म. क्र. १५: छत गळती काढणे.
5. पद्मावती कन्या वि. म. क्र. १७: पहिल्या मजल्यावरील खोली क्र. १ व २ छत गळती काढणे.
6. डॉ. झाकीर हुसेन वि. म. क्र. १९: वर्ग खोल्या गळती काढून मिळणे.
7. भारतमाता वि. म. क्र. ३३: वर्ग खोल्या व वरांडा गळती दुरुस्ती.
8. छ. संभाजी वि. म. क्र. ३५: वर्ग खोल्या व वरांडा गळती दुरुस्ती.
9. कस्तुरबा गांधी वि. म. क्र. ३८: पूर्वेकडून दक्षिणेची ४ थी खोली गळती काढणे.
10. डॉ. सरोजिनी नायडू वि. म. क्र. ४३: दोन वर्ग खोल्यांची गळती काढणे.
11. फक्रुद्दीन अली अहमद वि. म. क्र. ५२ वर्ग खोल्यांची गळती काढणे.
12. शाहीर अमरशेख उर्दू वि. म. क्र. ५६ छत गळती काढणे.
13. पं. जवाहरलाल नेहरू वि. म. क्र. २४: छत गळती काढणे.

आगामी पावसाळा विचारात घेता, शाळांच्या इमारतींचे संरक्षण व विद्यार्थ्यांची सुरक्षितता इ. विचार होवून सदरकामी बांधकाम विभागास आवश्यक ती प्रशासकीय तांत्रिक व दुरुस्ती विषयक कार्यवाही करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०७ दि. १५/०४/२०२६ नुसार मे. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे शाळेच्या छतावर पत्रे बसविणेबाबत प्रस्तावित करणेत आले आहे. छतावर पत्रे बसविणे तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय ? याबाबत बांधकाम विभागाचे अभियंता यांचेकडुन माहिती घेऊन सदरचा प्रस्ताव पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये सादर करणेत यावा.

सूचक : (सही) र. सा. रजपुते. अनुमोदक : (सही) नि. कि. जोवाट.

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.११
दि. २४/०४/२०२६

विषय क्र. ७: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळा इयत्ता १ ली ते ८ वी मधील ६८०० विद्यार्थी विद्यार्थिनींना स्पोर्ट्स ट्रॅकसूट पुरविण्यास मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०८ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी मधील एकूण सुमारे ६८०० विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक सर्वांगीण विकासास चालना मिळावी, क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग वाढावा तसेच शालेय स्तरावर एकसमान वेशभूषा निर्माण व्हावी या उद्देशाने सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ट्रॅकसूट उपलब्ध करणेबाबत प्रस्तावीत करणेत आले आहे.

सदर खरेदी प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची वैयक्तिक मोजमापे घेणे, निश्चित तांत्रिक तपशीलानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणे व निवड झालेल्या पुरवठादारामार्फत निर्धारित कालावधीत ट्रॅकसूटचा पुरवठा करून वितरण करणे यांचा समावेश राहील. ही संपूर्ण कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्य पद्धतीनुसार राबविणे प्रस्तावित आहे.

सदरकामी भांडार विभागास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ०८ दि. १५/०४/२०२६ नुसार मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी सदरचा विषय नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : [signature] पु. ना. धुत्रे

अनुमोदक : [signature] सौ. वे. श. मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.१२
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.८: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमधील स्वच्छतागृह दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृह बांधकामासाठी मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०९ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या खालील १५ प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांकडून स्वच्छतागृहांच्या दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृहे बांधकामाचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, सोबत जोडलेल्या यादीनुसार एकूण १५ शाळांकडून विविध कामांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुला-मुलींच्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती, नवीन शौचालय बांधकाम, वॉश बेसिन बसवणे आणि युरीनल्स बांधणे या कामांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या आणि स्वच्छतेच्या दृष्टीने शाळांमध्ये सुसज्जन व कार्यान्वित स्वच्छतागृहे असणे अनिवार्य आहे. काही शाळांमध्ये जुन्या स्वच्छतागृहांची पडझड झाली असून, काही ठिकाणी विद्यार्थी संख्येनुसार नवीन स्वच्छतागृह बांधकामाची आवश्यकता आहे.

त्या शाळांची नावे व प्रस्तावित कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

**A- बांधकाम-**

१. इ. अब्दुल हमीद वि.म. क्र. १४ मुलांचे स्वच्छतागृह व मुतारी बांधणे.
२. प. मोतीलाल नेहरू वि.म. क्र. ३६ मुलींचे स्वच्छतागृह बांधणे.
३. कस्तुरबा गांधी वि.म. क्र. ३८ मुलांचे शौचालय बांधणे.
४. छ. संभाजी वि.म. क्र. ३५ शौचालय बांधकाम.
५. राणी लक्ष्मीबाई वि.म. क्र. १३ स्वच्छतागृह बांधकाम.
६. ए. पी. जे. अब्दुल कलाम उर्दू क्र. ५७ मुलांचे स्वच्छतागृह व मुतारी बांधणे.
७. के. वेणूताई यशवंतराव चव्हाण क्र. ५४ मुलांचे शौचालय बांधणे.
८. डॉ. सरोजनी नायडू वि.म. क्र. ४२ मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत.
९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उर्दू वि.म. ३ मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत.
१०. अहिल्याबाई होळकर वि.म. क्र. ३० मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत.
११. हु. बाबू गेनू वि. म. क्र. २८ मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत.
१२. पं. जवाहरलाल नेहरू विद्यामंदिर क्र. २४ स्वच्छतागृह बांधकाम

**B-दुरुस्ती-**

१. सरदार वल्लभभाई पटेल वि.म. क्र. १५ मुलांचे स्वच्छतागृह दुरुस्ती.
२. भारतमाता वि.म. क्र. ३३ स्वच्छतागृह दुरुस्ती
३. पंडित बाळकृष्ण वि.म. क्र. ७ स्वच्छतागृह दुरुस्ती
४. फक्रुद्दीन अली अहमद वि.म. क्र. ५२ - स्वच्छतागृह दुरुस्त करून वॉश बेसीन बसवणे.

सदरकामी बांधकाम विभागास आवश्यक ती प्रशासकीय तांत्रिक व दुरुस्ती, नवीन बांधकाम करणे कार्यवाही करणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ०९ दि. १५/०४/२०२६ नुसार मे. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी वरील प्रमाणे मा. शिक्षण समितीने शिफारस केलेल्या शाळांमधील स्वच्छतागृह दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृह बांधकामाकामी ज्या शाळा सुरु आहेत त्याच ठिकाणी स्वच्छतागृह दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृह बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक तयार करुन त्यास आवश्यक प्राधिकरणाची मंजुरी घेवून निविदा प्रक्रीया पुर्ण करुन काम करुन घेणेत यावे.

सूचक : [signature] र. शा. रजपुते. अनुमोदक : [signature] नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र. १३
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.९: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळेसाठी संरक्षण भिंत बांधणेस मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १० दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागाकडील शाळा मुख्याध्यापकाकडून प्राप्त प्रस्तावांनुसार,खालील शाळांमध्ये संरक्षण भिंत बांधकामाची आवश्यकता आहे.

१. फक्रुद्दीन अली अहमद विद्यामंदिर क्र. ५२ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
२. पंडित बाळकृष्ण विद्यामंदिर क्र. ७ येथे जुनी भिंत दुरुस्त करून नवीन दगडी भिंत बांधणे.
३. आनंदीबाई कर्वे विद्यामंदिर क्र. १० च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
४. शाहिर अमरशेख उर्दू विद्यामंदिर क्र. ५६ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
५. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यामंदिर क्र. ५७ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
६. राणी लक्ष्मीबाई विद्यामंदिर क्र. १३ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
७. सरदार वाल्ल्भाई पटेल विद्यामंदिर क्र. १५ शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
८. कै. वेणूताई यशवंतराव चव्हाण विद्यामंदिर क्र.५४ शाळेची संरक्षण भिंत बांधणे.

शाळेतील विद्यार्थ्यांचे बाहेरील वाहतुकीपासून संरक्षण करणे, शाळा परिसराची सुरक्षितता राखणे आणि शाळा मालमत्तेवरील अतिक्रमण रोखणे या दृष्टीने 'संरक्षण भिंत' आणि 'दगडी भिंत' बांधण्याची कामे प्राधान्याने करणेबाबत प्रस्तावीत करणेत आले आहे.

सदरकामी बांधकाम विभागास आवश्यक ती प्रशासकीय तांत्रिक व 'संरक्षम भिंत बाधकाम कार्यवाही करणेबाबत करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १० दि. १५/०४/२०२६ नुसार मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी सदरचा विषय नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : P.Dhute प्र. ना. धुत्रे

अनुमोदक : Amohite सौ. वै. श. मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.१४
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.१०: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील CCTV कॅमेऱ्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती संगणक विभागाकडुन करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ११ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत असलेल्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि शालेय मालमत्तेचे संरक्षण या उद्देशाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत तांत्रिक बिघाडामुळे काही शाळांमधील कॅमेरे बंद अवस्थेत असून, संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यासाठी नियमित देखभालीची (Maintenance) नितांत आवश्यकता आहे. सदर CCTV नियंत्रण हे सबंधित शाळेतील मुख्याध्यापक यांचे कडे असणे आवश्यक आहे

वेळोवेळी दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण प्रणालीचा 'वार्षिक देखभाल करार' (Annual Maintenance Contract - AMC) करणे तांत्रिकदृष्ट्या सोयीचे ठरेल. यामध्ये खालील बाबींचा समावेश राहील:

* सर्व कॅमेऱ्यांची नियमित तपासणी व सर्व्हिसिंग.
* रेकॉर्डिंग (NVR/DVR) प्रणालीची सातत्यपूर्ण पडताळणी.
* नादुरुस्त सुटे भाग (Spares) बदलणे आणि केबलिंगची दुरुस्ती.

सदर काम तांत्रिक स्वरूपाचे असल्याने, संगणक विभाग (Computer Department) मार्फत बाह्य तांत्रिक एजन्सीची नियुक्ती करून ही कार्यवाही पूर्ण करणे प्रस्तावित आहे. संगणक विभागाच्या तांत्रिक पर्यवेक्षणाखाली ही यंत्रणा वर्षभर अखंडितपणे कार्यरत राहील. सदर वार्षिक देखभाल करारासाठी (AMC) लागणारा अंदाजित खर्च सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाच्या उपलब्ध निधीतून सदर काम संगणक विभागाकडून करण्यात येईल. सदरकामी संगणक विभागास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ११ दि. १५/०४/२०२६ नुसार मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये बसविणेत आलेले CCTV कॅमेरे ज्या एजन्सी कडुन बसविणेत आले आहेत त्या एजन्सीकडुन वॉरन्टी मुदतीतील काम पुर्ण करुन घेणेत यावे. वॉरन्टी मुदत संपलेनंतर देखभाल दुरुस्तीसाठीचा प्रस्ताव सादर करणेत यावा.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.१५
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.११: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमध्ये वाढीव वर्ग खोल्यांच्या बांधकामास मुंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या शाळा मधील मुख्याध्यापकांनी वाढत्या पटसंख्येच्या अनुषंगाने अतिरिक्त वर्ग खोल्यांची मागणी केली आहेविद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी व बैठक व्यवस्था सुलभ करण्यासाठी खालीलप्रमाणे नवीन खोल्यांचे बांधकाम करणेबाबत प्रस्तावीत करणेत आले आहे.

* डॉ. सरोजिनी नायडू शाळा क्र. ४३ - ०४ वर्ग खोल्या
* ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यामंदिर क्र. ५७ - ०२ वर्ग खोल्या
* राणी लक्ष्मीबाई विद्यामंदिर क्र- १३ ०२ वर्ग खोल्या
* हुतात्मा बाबू गेनू विद्यामंदिर क् . २८- ०३ वर्ग खोल्या
* कै.बाबुराव आवाडे विद्यामंदिर क्र.५१ - ०२ वर्ग खोल्या
* कै.पु.बा.सुभेदारकाका विद्यामंदिर क्र. ४८ - ०२ वर्ग खोल्या

सदर कामासाठी येणारा खर्च सन २०२६–२७ या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाकडील मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येईल.

सदर कामाचे सविस्तर आरखडे व तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. तसेच काम तांत्रिक स्वरूपाचे असल्याने सदर प्रस्ताव शहर अभियंता, बांधकाम विभाग यांच्याकडे वर्ग करून शाळा खोल्यांचे बांधकाम करून घेणे उचित राहील.

बांधकाम विभागास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत मान्यता मिळणे कामी शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार मे.स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी सदरचा विषय नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : प्र. ना. धुत्रे

अनुमोदक : वै. श. मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.१६
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.१२: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ओळखपत्र ( ID Card ) सुविधा पुरविणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना अद्ययावत ओळखपत्रे (Identity Cards) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शाळांमधील शिस्त आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब अनिवार्य आहे.

सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांशी समन्वय साधून शिक्षक व विद्यार्थ्यांची आवश्यक माहिती (नाव, पदनाम, वर्ग,रक्तगट, फोटो इ.) शिक्षण विभागामार्फत संकलित व प्रमाणित केली जाईल. सदर कामासाठी लागणारा संपूर्ण खर्च शिक्षण विभागाच्या सन २०२६-२७ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करण्यात येईल.

शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणित माहितीच्या आधारे पुढील तांत्रिक प्रक्रिया (उदा. निविदा प्रक्रिया / दरपत्रके मागवणे) मध्यवर्ती भांडार विभागामार्फत राबविण्यात येईल. प्रचलित खरेदी नियमांनुसार पुरवठादाराची निवड करून ओळखपत्रांची छपाई व वितरण भांडार विभागामार्फत करण्यात येईल.

निवडलेल्या एजन्सीकडून तयार करण्यात आलेला ओळखपत्राचा नमुना शिक्षण विभागामार्फत अंतिमरीत्या प्रमाणित केल्यानंतरच छपाईचे आदेश भांडार विभागाकडून दिले जातील.

सदरकामी भांडार विभागास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १३ दि. १५/०४/२०२६ नुसार मे.स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी मा. शिक्षण समितीचे शिफारशीनुसार इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ओळखपत्र ( ID Card ) सुविधा पुरविणेकामी भांडार विभागाकडुन सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास आवश्यक प्राधिकरणाची मंजुरी घेवून निविदा प्रक्रीया पुर्ण करुन ओळखपत्र देणेबाबतची कार्यवाही पुर्ण करणेत यावी.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : र. सा रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०३

स्था. स. ठराव क्र.१७
दि. २४/०४/२०२६

विषय क्र.१३: इचलकरंजी शहरातील आण्णा रामगोंडा भाजी मार्केट, शिवाजीराव खवरे भाजी मार्केट, अहिल्यादेवी होळकर भाजी मार्केट (उत्तम प्रकाश चित्रमंदिर जवळील विकली मार्केट), शॉपिंग सेंटर जवळ व शहापुर भाजी मार्केट येथे महिलांसाठी अद्ययावत मुतारी करणेबाबत तसेच शहरातील ठिकठिकाणी असणारे सार्वजनिक शौचालय व मुतारी खराब अथवा जीर्ण अवस्थेत असलेने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सदरची सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या अद्ययावत करणेबाबत श्री. अनिल देवकरण डाळया, उपमहापौर यांनी पत्राद्वारे मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील आण्णा रामगोंडा भाजी मार्केट, शिवाजीराव खवरे भाजी मार्केट, अहिल्यादेवी होळकर भाजी मार्केट (उत्तम प्रकाश चित्रमंदिर जवळील विकली मार्केट), शॉपिंग सेंटर जवळ व शहापुर भाजी मार्केट येथे महिलांसाठी अद्ययावत मुतारी करणेबाबत तसेच शहरातील ठिकठिकाणी असणारे सार्वजनिक शौचालय व मुतारी खराब अथवा जीर्ण अवस्थेत असलेने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सदरची सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या अद्ययावत करणेबाबत श्री. अनिल देवकरण डाळया, उपमहापौर यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे.

तरी आण्णा रामगोंडा भाजी मार्केट, , शॉपिंग सेंटर जवळ व शहापुर भाजी मार्केट येथे महिलांसाठी अद्ययावत मुतारी करणेबाबत तसेच शहरातील ठिकठिकाणी असणारे सार्वजनिक शौचालय व मुतारी खराब अथवा जीर्ण अवस्थेत असलेने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सदरची सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या अद्ययावत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच शिवाजीराव खवरे भाजी मार्केट येथील महिलांसाठींची मुतारी बांधणेत आलेली असुन ती सुरु करणेत यावी. व अहिल्यादेवी होळकर भाजी मार्केट (उत्तम प्रकाश चित्रमंदिर जवळील विकली मार्केट) येथील मुतारी दुरुस्त करणेत यावी. सदरची कार्यवाही ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन करणेत यावी.

सूचक : [signature] र. सा. रजपुते.

अनुमोदक : [signature] नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०४

स्था. स. ठराव क्र. १८
दि. २४/०४/२०२६

विषय क्र. १४: धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या दि. १४/५/२०२६ रोजी होणाऱ्या जयंती निमित्त श्री. शंभुतिर्थ येथे दि. १३/०५/२०२६ , १४/०५/२०२६ रोजी शाहिरी पोवाडे, शस्त्र प्रदर्शन, मर्दानी खेळ, विद्युत रोषणाई, आतिषबाजी असे विविध कार्यक्रम आयोजित करणेकरीता योग्य अशी आर्थिक तरतुद करणेबाबत धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज प्रतिष्ठान यांनी दि. २२/०४/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभा केला असुन सदरचा चौकसुद्धा सुशोभिकरण करणेत आलेला आहे.

धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज प्रतिष्ठान यांनी दि. १४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची दि. १४ मे २०२६ रोजी होणारी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करणेबाबत व या निमित्ताने शंभुतीर्थ येथे दि. १३ व दि. १४ मे २०२६ रोजी शाहीरी पोवाडे, शस्त्रप्रदर्शन, मर्दानी खेळ, विद्युत रोषणाई असे विविध कार्यक्रम आयोजीत करणेबाबत मागणी केली आहे.

तरी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंती निमित्त श्री. शंभुतिर्थ येथे दि. १३/०५/२०२६ , १४/०५/२०२६ रोजी शाहिरी पोवाडे, शस्त्र प्रदर्शन, मर्दानी खेळ, विद्युत रोषणाई, असे कार्यक्रम आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर कामी रु. १० लाख इतक्या खर्चास मंजुरी देणेत येत असुन सदर जयंती कार्यक्रम व आयोजित करणेत येणारे उपक्रम हे समाजविकास समितीच्या निधीतुन समाजविकास विभागामार्फत आयोजित करणेस व त्यासाठी मा. आयुक्त यांनी आवश्यकती कार्यवाही करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] र. सा. रजपुते.

अनुमोदक : [signature] प्र. जा. धुत्रे.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
~~सभापती~~
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner